दैनिक राजधर्म

# लातूर जिल्हा कारागृहात सायबर सेक्युरिटी कार्यशाळा



**लातूर,प्रतिनिधी:** राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम लातूर जिल्ह्यामध्ये मागील तीन वर्षांपासून राबविला जात आहे. या उपक्रमाअंतर्गत शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी व तसेच शेतकऱ्यांसाठी, शासकीय कार्यालये, बँका, ग्रामपंचायत, महिला बचत गट, दवाखाने, साखर कारखाने, इत्यादी ठिकाणी या कार्यशाळेचे आयोजन केले जात आहे. याचाच भाग म्हणून लातूर जिल्हा कारागृहात कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी व स्टाफसाठी सायबर सेक्युरिटी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेत शाहू महाविद्यालयातील बी. एस्सी. सी. एस. तृतीय वर्षातील यज्ञेश शिंदे व जीत बुधोडकर या विद्यार्थ्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे सध्या घडत असलेले विविध सायबर गुन्हे जसे की फिशिंग, डिजिटल अरेस्ट, आर्थिक फसवणूक, सोशल मीडियाद्वारे फोटो किंवा वैयक्तिक माहितीचा गैरवापर यांसारख्या सायबर गुन्ह्यांची माहिती विविध उदाहरणे देऊन सांगितले. तसेच, अनोळखी मेसेजेस व लिंक्सवर क्लिक न करणे, वैयक्तिक माहिती शेअर न करणे, आणि अशा गुन्ह्यांची सायबर सेलमध्ये नोंदणी कशी करावी, तसेच १९३० या हेल्पलाईन क्रमांकाबद्दल माहिती दिली.याप्रसंगी श्री. बक्सार मुलाणी (तुरुंगाधिकारी श्रेणी-१), श्री. ब्रम्हदेव लटपटे (तुरुंगाधिकारी श्रेणी-२), डॉ. शिवकुमार भांजे (मेडीकल ऑफिसर), कारागृहातील इतर पदाधिकारी व स्टाफ उपस्थित होते व त्यांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.